<u>नि. फौ. ख. क्र. १३१/२०१९</u> निशाणी २२

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – सागर देविदास बोनगिरे

वय – ४२ वर्षे, व्यवसाय – नोकरी, तलाठी

पत्ता – रा. रामदास पेठ, अकोला, ता. जि. अकोला

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी सन २०१० पासून आजपर्यंत तलाठी म्हणून नोकरी करतो. सन २०१८ मध्ये मी बोरगाव मंजू भाग ३ येथे तलाठी म्हणून कार्यरत होतो. दि.२७.१२.२०१८ रोजी मला मा. तहसिलदार, अकोला यांचा पंच म्हणून उपस्थीती राहण्याबाबत आदेश आला होता. आता मला सदर आदेशाचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच असून त्यावर संबंधित तहसिलदार यांची सही आहे. त्यास **आर्टीकल १** देण्यात येत आहे.

२. सदर पत्रातील आदेशानुसार मी दि.२८.१२.२०१८ रोजी ग्राम व्याळा येथे सचिन वानखडे यांच्या घरी पंच म्हणून हजर राहण्याकरीता गेलो होतो. त्या ठिकाणी पथक प्रमुख श्रीमती सातरोटे मॅडम, सोबत इतर कर्मचारी व पोलीस हजर होते. त्या ठिकाणी सचिन वानखडे याच्या घराची पथक प्रमुख सातरोटे मॅडम यांनी घरझडती घेतली. घरझडती घेण्यापुर्वी आम्ही सचिन वानखडे यास ओळख करुन दिली व घरझडती घेण्याबाबत त्यास सांगितले. आम्ही स्वतःची अंगझडती स्वतः सचिन वानखडे याच्या समोर घेतली. त्यानंतर सचिन वानखडे यास आम्ही त्याच्या घराची झडती घेत असल्याचे सांगितले. सदर घराच्या पश्चिमेस दरवाजा होता. आम्ही सदर घराच्या पहिल्या खोलीमध्ये प्रवेश केला. सदर खोलीमध्ये एक पलंग, टेबल, खुर्ची व लोखंडी अलमारी ठेवलेली होती. सदर लोखंडी अलमारीची आम्ही झडती घेतली असता त्यामध्ये एक रु.१०० चा लिहीलेला स्टॅम पेपर मिळून आला. त्या स्टॅमपेपरवर हेरोळे यांचे नाव लिहीलेले होते, रा. आंबेडकर नगर, अकोला असे नमुद केले होते. सदर स्टॅमपेपरवर हेरोळे यांनी रक्कम रु.१५०००/– ५ टक्के व्याजाने सचिन वानखडे याच्याकडून घेतलेले होते, असा मजकूर नमुद केलेला होता. सदर स्टॅमपेपर आम्ही आमच्या ताब्यात घेतला व सदरची रुम ही सिल केली. सदर

झडतीला पंचनामा पथम प्रमुख सातरोटे मॅडम यांनी तयार केला. सदर पंचनाम्यातील मजकूर आम्हाला वाचून दाखविला तसेच त्यावर मी व पथकातील इतर लोक यांनी त्यावर सही केली. सचिन वानखडे याची सही घेतली होती अथवा नाही, हे मला आठवत नाही. मी पुन्हा सांगतो की, सचिन वानखडे याची सदर पंचनाम्यावर सही घेतली होती. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला त्यावर, माझी, पथक प्रमुख व आरोपीची तसेच इतर यांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येत आहे.

२. आता मला सदर जप्त करण्यात आलेला बॉड दाखविण्यात आला तो तोच असून घर झडती पंचनाम्यामध्ये जप्त केला होता. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येत आहे. पोलीसांनी माझी घटनेबाबत चौकशी केली नव्हती. सचिन वानखडे यास मी ओळखू शकतो. सचिन वानखडे न्यायालयात हजर असल्याबाबत साक्षीदार यांनी सांगितले.

सरतपास पूर्ण.

मध्यान्हाची वेळ झाली असल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास दुपारच्या सत्रापर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

**दिनांक : ०५.०६.२०२६.**
**ठिकाणः बाळापूर**

**( डी. एम. वाघमारे )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

**<u>मध्यान्हानंतर आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी. इंगळे यांचे मार्फत उलटतपास शपथेवर सुरुः</u>**

३. व्याळा येथील ज्या घराचा झडती पंचनामा आम्ही केला त्या घराच्या मालकीबाबत संबंधित सरपंच, ग्रामसेवक, तलाठी व पोलीस पाटील यांच्याकडून माहिती गोळा केली अथवा नाही, याबाबत मला माहित नाही. व्याळा येथील कोणत्याही नागरिकाशी माझा परिचय नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सदर पंचनामा करण्यापुर्वी मी संबंधित घराच्या मालमत्तेबाबत व मालमत्ता क्रमांक याबाबत कोणतेही कागदपत्र प्राप्त केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सचिन वानखडे नावाचा व्यक्ती हा व्याळा येथे राहतो अथवा इतरत्र राहतो याबाबत मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पथक प्रमुख श्रीमती

सातरोटे यांनी मला पंचनाम्यावर सही करायची आहे असे सांगितले त्यामुळे मी पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, आज न्यायालयात पुरावा देण्यापुर्वी मी पंचनाम्यातील मजकूर वाचला. ज्या पंचनाम्यावर मी सही केली त्या पंचनाम्यामध्ये सदरची रुम सिल केली, हा मजकूर नमुद केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.२४ कडील स्टॅम्प कोणी विकत आणला होता, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर स्टॅम मी पाहिला नाही, म्हणून मला सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.१२.२०१८ रोजी मी व्याळा येथे घरझडती पंचनामा करण्याकरीता पथक प्रमुख सातरोटे व इतर कर्मचारी यांच्यासोबत गेलो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमोर कोणताही घरझडती पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान सांगितलेला मजकूर खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०५.०६.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.06.05 17:07:20 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०५/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०५/०६/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०५/०६/२०२६ |